# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Thieves**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **25/01/2023**

**Brief of the work done :-**

बसमध्ये चोरी करण्याच्या प्रयत्नातील 4 महिला पो.स्टे. कारंजा शहर पोलिसांच्या ताब्यात.

# एसटी मध्ये चोरीचा प्रयत्न करणाऱ्या ४ महिला पोलिसांच्या ताब्यात

## शहर पोलिसांची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...



**कारंजा** ■ वाशिम-गडचिरोली या एसटी बसमध्ये चोरीचा प्रयत्न करणाऱ्या ४ महिलांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या. हि घटना २३ जानेवारीला दुपारी घडली. सदर प्रकरणी दाखल फियार्दीवरुन पोलिसांनी विविध कलमानुसार गुन्हा दाखल करुन महिलांना अटक केली आणि कारंजा न्यायालयापुढे हजर केले असता, न्यायालयाने त्या महिलांची रवानगी वाशिम मध्यवर्ती कारागृहात केली.

प्राप्त माहितीनुसार मालेगांव येथील सुपर शॉपी व्यापारी पुंडलिकराव नावस्थळे हे वाशिम-गडचिरोली या बसने प्रवास करीत असतांना या ४ महिलांनी त्यांच्या बॅगमधील नगदी रोकड चोरण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या हि बाब लक्षात येताच त्यांनी वाहकाला बस कारंजा शहर पोलिस स्टेशनमध्ये घेण्यास सांगितले. आणि सदर प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली. त्यावरुन शहर पोलिसांनी भादविच्या कलम ३७९, ५११ व ३४ नुसार गुन्हा दाखल करुन चोरीचा प्रयत्न करणा-या महिलांना ताब्यात घेतले. या बॅगमध्ये ७३ हजार रुपये होते. अटक केलेल्या महिलात कसुरी राजू गाजु, ज्योती अशोक गाजु, लक्ष्मी रमेश गाजु आणि कविता उर्फ रोजा शिवाजी गाजु या महिलांचा समावेश असून, त्या २१ ते २५ वर्ष वयाच्या आहेत. आणि नांदेड येथील अर्धापुर बस स्टँड परिसरातील झोपडपट्टीतील रहिवाशी आहेत. या महिलांसोबत ३ चिमुकलेही होते. वाशिम-गडचिरोली बसमध्ये फिर्यादी कारंजा येथे येत असतांना या ४ महिलांनी दादागिरी करत फिर्यादीच्या बॅगितील नगदी रक्कम चोरण्याचा प्रयत्न केला.

सद्या चोरीचा प्रयत्न करणा-या महिलांची रवानगी कारंजा न्यायालयाने वाशिम मध्यवर्ती कारागृहात केली आहे. त्यामुळे एसटी बसने प्रवास करतांना सतर्कता बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे. (ता.प्र.)